## राजेश ढगे (केटरिंग))

राजेश ढगे हे पद्मावती, पुणे येथे राहतात. तेथूनच त्यांनी केटरिंगचा व्यवसाय चालू केलेला आहे. पद्मावती परिसरात ते चांगलेच लोकप्रिय झालेले आहेत. परंपरा केटरर्स या नावाने ते आपला व्यवसाय चालवतात. मिटकॉनमध्ये कोर्स करण्याच्या अगोदर पासून ते हा व्यवसाय करतात. मिटकॉनच्या कोर्स चा फायदा काय , या प्रश्नाचे उत्तर त्यांनी, ‘‘ माणूस हा अपरिपक्व असतो. तो योग्य प्रशिक्षणामुळे परिपक्वतेच्या वाटेने जातो, मिटकॉनच्या कोर्समुळे मी त्या वाटेने गेलो. तरीही अजून खूप शिकावसं वाटतं.’’ या शब्दांत दिले. ते सांगतात त्यांच्या सर्व व्यसवसायाचा पाया प्रामाणिकपणा हा आहे. ते म्हणतात, ‘‘ मी लोकांना कधीच फसवत नाही. जेवणात कधीच हलका माल वापरत नाही, त्यामुळेच माझ्याकडे वर्षभर ऑर्डर्स चालू असतात.’’ वर्षभरात त्यांना लग्नाच्या ३०–४० ऑर्डर्स मिळतात. याशिवाय बारसं, मुंज, प्रायव्हेट पार्टी याच्याही ऑर्डर्स त्यांच्याकडे असतात. त्यांच्याकडे हंगामी १०० लोक काम करतात. त्यांची सर्वांत उल्लेखनीय गोष्ट असेल तर त्यांनी आपल्या परंपरा केटरर्स ची व्यावसायिक जाहिरात कुठेही केलेली नाही. केवळ गुणवत्ता या निकषावर लोक त्यांच्याकडे ऑर्डर्स घेऊन येतात. या सर्व यशस्वीतेचे श्रेय स्वत:चा प्रामाणिकपणा व मिटकॉनमध्ये केलेला कोर्स याला ते देतात.

– संतोष सोनावणे